दै. पुढारी दि. ०८/०७/२०२२

# कट रचून खून केल्याप्रकरणी तिघांना जन्मठेप

## पोटावर, छातीवर चाकूने केले होते बारा वार





**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** पूर्ववैमनस्यातून कट रचून आनंद केशव भगत यांचा चाकूने भोसकून खून केल्याप्रकरणी तसेच सदानंद मुकिंदा भगत यांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायाधीस अशोक धामेचा यांनी तिघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली तर प्रकरणातील पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली. ही घटना माहूर येथे ९ सप्टेंबर २०१८ रोजी घडली.

आनंद भगत हे घटनेच्या दिवशी माहूर येथील आंबेडकर चौकात उभे असताना प्रीतीश विजय मानकर, सतीश विजय मानकर, देवानंद नथू भगत, [illegible] विजय मानकर, गौतम नथू भगत, विजय एकनाथ मानकर, कुसुमबाई विजय मानकर, निर्मलाबाई गौतम भगत हे भगत त्यांच्याजवळ आले आणि देवानंद याने आनंद यांच्या डोळ्यात लालमिर्ची पावडर टाकून त्यास धरले आणि इतरांना त्याला मारण्यास उद्युक्त केले. त्यानंतर प्रीतीश याने त्याच्या कमरेजवळ लपवलेला चाकू काढून आनंद याच्या पोटावर, छातीवर सपासप ११ ते १२ वार केले. तसेच सतीशनेही आनंदला चाकूने भोसकले. त्याचवेळी त्याला सोडविण्यासाठी सदानंद मुकिंदा भगत हे आले असता प्रीतीश याने त्यांनाही चाकूने भोसकून गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान आनंद यांचा दवाखान्यात मृत्यू झाला. तसेच आनंदला मारताना सोडविण्यासाठी आलेल्या भीमाबाई भगत यांच्या डोळ्यात उर्वरित पाच आरोपींनी मिर्ची पावडर टाकून काठीने त्यांनाही काठीने मारहाण केली. या प्रकरणी माहूर पोलिस ठाण्यात एकूण नऊ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासिक अंमलदार एम.डी. शिवरकर यांनी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. आशिष गोधमगावकर यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. या घटनेतील एक आरोपी अल्पवयीन असल्याने त्याचे दोषारोप पत्र बालन्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

---



**क्राइम-न्यायालयातून**

# भोकर येथील मटका अड्ड्यावर पोलिसांची धाड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ भोकर शहरात खेळल्या जात असलेल्या मटका अड्ड्यावर पोलिसांनी ६ जुलै रोजी धाड टाकली. मराठवाडा चिकन बिर्याणी हॉटेलच्या बाजूला कल्याण नावाचा मटका खेळल्या जात होता. यावेळी पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याकडून नगदी ६ हजार ६०० रुपये व मोबाईल असा एकूण १२ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोकॉ ज्ञानेश्वर सरोदे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून भोकर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**मोटार सायकलची चोरी :** एका इसमाची मोटार सायकल चोरून नेल्याची घटना ४ जुलै रोजी रात्री बाऱ्हाळी ते कबनुर मार्गावर घडली. बालाजी देशमुख यांनी त्यांची मोटार सायकल सदर ठिकाणी उभी करून ठेवली होती. ती चोरट्यांनी रात्री चोरून नेली. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादी वरून मुक्रमाबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**मोटार सायकलची चोरी :** एका तरुणाची मोटार सायकल चोरून नेल्याची घटना २७ जुलै रोजी रात्री किनवट तालुक्यातील वझरा येथे घडली. येथील रहिवासी संदीप रेकुरवार यांनी त्यांची मोटार सायकल त्यांच्या घरासमोर उभी करून ठेवली होती. ती चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादी वरून मांडवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**शाळेतून मोबाईल लंपास :** शहरातील केंद्रीय विद्यालयातून मोबाईल लंपास केल्याची घटना १ जुलै रोजी घडली. मुदखेड तालुक्यातील मेंढकला येथील रहिवासी लक्ष्मण दासरे यांची मुलगी सदर शाळेत शिक्षण घेत असून तिच्या बॅग मधून मोबाईल लंपास केला. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून मुदखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.